(३५५)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा /सप्रा ३/१०००/२०२२
दिनांक :२८/०८/२०२२.

# झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद फा.प्लॉ.नं.४८६/क, स.नं.३८/४अ/२, साईनाथ वसाहत, पर्वती, पुणे येथील झोपडपट्टी क्षेत्रावर क्षेत्रफळ १५२०.४५ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. ओंकार इन्व्हेस्टमेंटस् यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव दाखल करणेत आलेला आहे; आणि

ज्याअर्थी अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व ती महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२१/०६/१९८४, भाग १ पुरवणी, पान नं.२५० कलम ४(१) अन्वये गलिच्छ वस्ती म्हणून ४६४०.०० चौ.मी. क्षेत्र घोषित आहे. तसेच दाखल प्रस्तावानुसार क्षेत्र १५२०.४५ चौ.मी. एवढे योजनाक्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.१२/०७/२०२२ रोजीची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र जुलै २१- २७, २०२२ पान क्र. २-३ मध्ये तसेच महाराष्ट्र निरोप्या व दैनिक जन मंथन या वृत्तपत्रात दि.१३/०७/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.१५/०७/२०२२ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि ज्याअर्थी, सदर

दि.१२/०७/२०२२ रोजीच्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबतची पुर्वसूचना नोटीशीस विहीत मुदतीमध्ये कोणतीही आक्षेप / हरकत प्राप्त झालेले नाहीत;

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

**झोपडपट्टीचे नाव :** **फा.प्लॉ.नं.४८६/क, स.नं.३८/४अ/२, साईनाथ वसाहत, पर्वती, पुणे**
**महानगरपालिका क्षेत्र :** **पुणे महानगरपालिका.**

**अनुसूची**

| गाव | फा.प्लॉ./ स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमीती नुसार) | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| साईनाथ वसाहत, पर्वती | फा.प्लॉ.नं. ४८६/क, स.नं.३८/ ४अ/२ | सरकारी (महाराष्ट्र शासन) | १५२०.४५ चौ.मी. | **पुर्वेस** - फा.प्लॉ.क्र.४८६ ड, पै. | |
| | | | | **पश्चिमेस** - लागू जागेवरील रस्ता व फा.प्लॉ.क्र.४८६ क, पै मिळकत. | |
| | | | | **दक्षिणेस** - फा.प्लॉ.४८६ क, पै. | |
| | | | | **उत्तरेस** - लागू रस्ता. | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :-२६/०८/२०२२.

26-8-2022

(राजेंद्र निंबाळकर) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वस प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :-

१. जमिन मालक - मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे - यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. विकसक मे. ओंकार इन्वेस्टमेंटस् -यांना माहितीस्तव सादर.
३. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे - यांना माहितीस्तव सादर.
४. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६.